**ठळक बातम्या**

- भारत विस्तारवाद नाही, तर विकासवादाच्या दिशेनं काम करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन /मुंबईत नौदलाच्या सुरत, नीलगिरी या नौकांचं आणि वाघशीर या पाणबुडीचं केलं राष्ट्रार्पण
- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी वाल्मिक कराडला २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी
- आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाला सुवर्णपदक

  **आणि**
- महिला क्रिकेटमधे, तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात आयर्लंडला ३०४ धावांनी पराभूत करत भारताचा ३-० असा मालिकाविजय, प्रतिका रावल आणि स्मृती मंधाना यांची शतकं

**<><><><><>**

भारत विस्तारवाद नाही, तर विकासवादाच्या दिशेनं काम करत आहे. भारतानं खुल्या, सुरक्षित, समावेशक आणि समृद्ध भारत-प्रशांत क्षेत्राचं नेहमीच समर्थन केलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज मुंबईत नौदलाच्या गोदीत सुरत आणि नीलगिरी या युद्धनौका, तसंच वाघशीर ही पाणबुडी नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट केल्यानंतर बोलत होते. नौदलाच्या ताफ्यात एकाच वेळी एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी समाविष्ट होण्याची ही पहिलीच वेळ आहे. यामुळं भारताची सुरक्षा आणि प्रगतीला नवीन सामर्थ्य मिळेल असं ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची स्थापना केली, त्याच पवित्र भूमीवर २१व्या शतकात नौदलाला बळकटी देण्याच्या दिशेनं हे खूप मोठं पाऊल असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं.....

**होल्ड... बाइट--- प्रधानमंत्री**

गेल्या १० वर्षांत भारताच्या तिन्ही सशस्त्र दलांनी आत्मनिर्भरतेचा मंत्र अवलंबला आहे, त्याचं त्यांनी कौतुक केलं. सर्वांच्या सहकार्यानं लवकरच संरक्षण क्षेत्राचा कायापालट होईल, संकटकाळात इतर देशांवरचं भारताचं अवलंबित्व कमी करणं, रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करणं यामुळे शक्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वाढवण बंदराला मंजुरी, सीमावर्ती भागांमध्ये वाढती जोडणी, भारतमाला योजना, व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रमाचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भविष्यात अवकाश आणि खोल समुद्र या दोन क्षेत्रांचं महत्त्व खूप वाढणार असून त्या क्षेत्रात भारताची ताकद वाढवण्याचं काम सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

भारत-प्रशांत क्षेत्र भारतासाठी ऐतिहासिक काळापासून महत्त्वाचं आहे, त्यामुळे या क्षेत्रात सशक्त नौदल असण्याला देशाच्या दृष्टीनं मोठं प्राधान्य आहे. ते साध्य करण्याच्या दृष्टीनं या तीन नौकांचा नौदलात समावेश हा महत्वाचा टप्पा असल्याचं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं.

भारतीय नौदलाच्या वेगवान कामामुळेच भारत-प्रशांत क्षेत्रातली सागरी सुरक्षा कायम ठेवण्यात यश आलं आहे, असं नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी म्हणाले.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

नवी मुंबईतल्या खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज झालं. अध्यात्म हा आपल्या संस्कृतीचा गाभा आहे. भारत समजून घेण्यासाठी आधी हे अध्यात्म आपल्या आत रुजवायला हवं, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. मानवतेची सेवा हे या अध्यात्मिक संस्कृतीचं मूळ आहे आणि याच धारणेतून केंद्र सरकारनं आयुष्मान भारत, हर घर जल, उज्ज्वला योजना इत्यादी कार्यक्रम राबवले आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

सशस्त्र दलाच्या अतुलनीय बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आज लष्कर दिन साजरा करण्यात आला.

लष्कर दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लष्करातले जवान आणि ज्येष्ठ तसंच निवृत्त सैन्य अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सैनिक देशाच्या प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी योगदान देतात, असं मुर्मू यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लष्कर दिनानिमित्त सैनिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दृढनिश्चयाच्या बळावर भारतीय लष्कराने सदैव देशाचं संरक्षण केलं आहे. सैन्य दलांमध्ये विविध सुधारणा तसंच आधुनिकीकरणाला सरकार प्राधान्य देत असल्याच त्यांनी म्हटलं आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही जवानांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

लष्कर दिन हा फक्त एका दिवसाचा कार्यक्रम नाही, तर वर्षाचे ३६५ दिवस डोळ्यात तेल घालून देशाचं रक्षण करणाऱ्या लष्कराच्या जवानांचे आहेत, असं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. ७७व्या लष्कर दिनाचं मुख्य संचलन आज पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर झालं, त्यावेळी गौरवगाथा या कार्यक्रमात ते बोलत होते. ज्या पवित्र भूमीवर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, बाजीराव पेशवे यांच्यासारख्या वीर सुपुत्रांनी जन्म घेतला, महाराणी ताराबाईंनी बलिदान दिलं, बाळ गंगाधर टिळकांनी स्वातंत्र्याची प्रेरणा जागवली, त्या पुण्यभूमीत या कार्यक्रमाचं आयोजन होणं ही बाब गौरवशाली असल्याचं सिंह यांनी नमूद केलं.

तत्पूर्वी, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मानवंदना स्वीकारली. लष्कर, पोलीस दल आणि महाराष्ट्र छात्रसेनेच्या महिला पथकाचा संचलनात सहभाग होता. प्रथमच नेपाळचा लष्करी वाद्यवृंदही या कार्यक्रमात सहभागी झाला होता.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी वाल्मिक कराडला न्यायालयानं २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी  सुनावली आहे. आजच्या सुनावणीबद्दल जिल्हा सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी सांगितलं,

**होल्ड… बाईट- बाळासाहेब कोल्हे**

सुनावणीनंतर कराडला न्यायालयाबाहेर घेऊन जात असताना त्याच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी कराड समर्थक आणि विरोधकांनी एकमेकांविरोधात घोषणाबाजी केली. त्यामुळे पोलिसांना बळाचा वापर करत कराडला बाहेर काढावं लागलं.

**<><><><>**

चंदीगडच्या पंजाब विद्यापीठात ९ ते १८ जानेवारी दरम्यान आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत मुंबई विद्यापीठानं सुवर्णपदक पटकावलं आहे. ५० मीटर थ्री पोझिशन रायफल नेमबाजीत पुरुष गटात रुद्रांक्ष पाटीलनं आपल्या उत्कृष्ट नेमबाजीच्या जोरावर ६०० पैकी ५९३ गुण मिळवत सुवर्णपदक मिळवलं. यापूर्वी रुद्रांक्षनं आशियाई क्रीडा स्पर्धेत देशाला सुवर्णपदक मिळवून दिलं होतं. रुद्रांक्षनं गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसरचा ऑलिंपियन नेमबाज ऐश्वर्य प्रतापसिंग तोमर याला एका गुणानं मात देऊन सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं. या स्पर्धेत देशभरातल्या १४५ विद्यापीठांमधले १ हजार ९०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते.

**<><><><>**

महिला क्रिकेटमधे राजकोट इथं झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतानं आयर्लंडला ३०४ धावांनी पराभूत करत या मालिकेत ३-० असा निर्भेळ विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ५ गड्यांच्या मो◌ेबदल्यात ४३५ धावा केल्या. सलामीवीर प्रतिका रावल आणि स्मृती मंधाना या दोघींनी शतकं ठोकली. प्रतिकानं १५४, तर मंधानानं ८० चेंडूत १३५ धावा केल्या. या दोघींनी पहिल्या गड्यासाठी २३३ धावांची भागिदारी करत भारताच्या विजयाचा पाया रोवला. अवघ्या ७० चेंडूत स्मृतीनं आज आपलं शतक पूर्ण केलं. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात याआधी हरमनप्रीत कौरनं ८७ चेंडूत शतक झळकावलं होतं. तिचा विक्रम आज स्मृतीनं मोडला. त्यामुळे वेगवान शतक झळकावणाऱ्या भारतीय महिला फलंदाजांच्या

यादीत ती आता अव्वलस्थानी पोहोचली आहे. ऋचा घोषनं ५९ धावांचं योगदान दिलं.

विजयासाठी ४३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आयर्लंडचा संघ ३२ व्या षटकातच १३१ धावात गारद झाला. दिप्ती शर्मानं ३, तनूजा कंवरनं २, तर तितास साधू, सायली सातघरे, आणि मिन्नू मणी यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

प्रतिका रावल या सामन्यातली, तसंच मालिकेतलीही, सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><>**

येत्या रविवारी १९ तारखेला आकाशवाणीवर 'मन की बात' कार्यक्रमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११८वा भाग असेल. त्यासाठी आपल्या सूचना आणि कल्पना पाठवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. 1800-11-7800 या टोल फ्री क्रमांकाबरोबर मायजीओव्ही आणि नमो ॲपवरुनही संपर्क साधता येईल.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. सर्वात कमी किमान तापमान महाबळेश्वर इथं १५ अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.